# समाज भूषण बाबूराव उर्फ अप्पासाहेब जेधे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, पुणे २

**प्रथम सत्रांत परिक्षा २०१४-२०१५**

**विषय – मराठी साहित्यविचार अभ्यासपत्रिका ३. (S-3)**

**वेळ - २ तास**

**तृतीय वर्ष कला** **गुण - ६०**

---

**सूचना –** १) सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.
२) उजवीकडील अंक पूर्ण गुण दर्शवितात.

**प्र.१ खालीलपैकी सात प्रश्नांची उत्तरे २० शब्दांत लिहा.** **१४**

१) साहित्याचे दोन वर्ग कोणते ?
२) शब्दाची दोन रूपे कोणती ?
३) 'भामह' या संस्कृत साहित्य मीमांसकाने केलेली साहित्याची व्याख्या.
४) कोलरिज या पाश्चात्य साहित्य समीक्षकाने केलेली काव्याची व्याख्या.
५) अनुभव संकल्पनेतील तीन घटक सांगा.
६) कला व्यापाराची तीन केंद्रे कोणती ?
७) 'विरेचन' म्हणजे काय ?
८) 'दण्डी'ने केलेली प्रतिभेची व्याख्या सांगा.
९) भाषा संदेशवहनातील तीन घटक लिहा.
१०) शब्दाच्या ठिकाणी वसणाऱ्या त्रिविध शक्ती कोणत्या ?

**प्र.२ खालीलपैकी दोन प्रश्नांची उत्तरे ५० शब्दात लिहा.** **८**

१) 'साहित्याचे शब्दरूप' थोडक्यात स्पष्ट करा.
२) साहित्याचे प्रयोजन 'अनुभवविश्वाची समृद्धी'.
३) साहित्यनिर्मितीची शक्ती स्फूर्तीचे महत्त्व सांगा.
४) भाषिक व्यवहारातील संकल्पना 'प्रतिमा'

**प्र.३ खालीलपैकी तीन प्रश्नांची उत्तरे १५० शब्दात लिहा.** **१८**

१) वास्तव आणि कल्पित यांच्यातील संबंध स्पष्ट करा.
२) प्रयोजन आणि परिणाम यातील भेद विशद करा.
३) साहित्यनिर्मितीच्या शक्ती 'कल्पनाशक्ती आणि उत्प्रेक्षण शक्ती यातील फरक सांगून त्यांचे कार्य स्पष्ट करा.
४) साहित्यिकाच्या व्यक्तिमत्वाची गुणवैशिष्ट्ये लिहा.
५) ललित साहित्याच्या संदर्भात बोली भाषेचा उपयोग व महत्त्व सांगा.

**प्र.४ खालीलपैकी एका प्रश्नाचे उत्तर ३०० शब्दात लिहा.** **२०**

१) ललित साहित्य आणि शास्त्रीय साहित्य यातील फरक स्पष्ट करा.
२) साहित्यातून व्यक्त होणाऱ्या अनुभवाचे विशेष स्पष्ट करा.
३) साहित्यातील प्रतिभा शक्तीचे स्वरूप व कार्य सविस्तर स्पष्ट करा.

***